








रविकांत धनशेट्टी

**नुकतेच अक्कलकोट व दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीची पंचवार्षिक निवडणूक अत्यंत चुरशीने शांततामय वातावरणात पार पडली. दोनही बाजार समितीमध्ये आ. सचिन (दादा) कल्याणशेट्टी व माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांच्या नेतृत्वाखाली अक्कलकोट येथे सत्ता अबाधित राखली तर दुधनी येथील माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम (अण्णा) म्हेत्रे यांच्या ताब्यातील बाजार समितीचा गड ढासळल्याने म्हेत्रे यांना आत्मचिंतन करण्याची वेळ आल्याची तालुक्यात जोरदार चर्चा सुरु आहे.**

# दादा-अप्पांनी घडवला इतिहास; अण्णांवर आत्मचिंतनाची वेळ

गत महिनाभरापासून अक्कलकोट तालुका हा स्वामी समर्थ सहकारी साखर कारखाना आणि अक्कलकोट व दुधनी बाजार समितीच्या निवडणुकीने ढवळून निघाला. कारखान्याच्या निवडणुकीत माजी आमदार सिद्रामप्पा पाटील व आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाने १३ संचालक बिनविरोध झाल्याने विरोधकांची हवा गुल झाली. मात्र तरी देखील विरोधकांनी मागे न हटता पॅनल तयार करुन निवडणूक लढविली खरी; मात्र डिपॉझिट जप्तह टाळता आली नाही. या निवडणुकीत अत्यंत कमी झालेल्या मतदानावरुन सिद्रामप्पा पाटील व आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पॅनलच्या उमेदवारांनी विक्रमी मते ही तडवळ भागात असलेले मजबूत पकड विरोधकांना पुन्हा एकदा दिसून आले.

अक्कलकोट बाजार समितीकरिता भाजपाकडून आमदार सचिन कल्याणशेट्टी व माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांच्या श्री स्वामी समर्थ शेतकरी विकास पॅनल तर मल्लिकार्जुन पाटील, आनंद तानवडे व दत्ता शिंदे यांचे श्री स्वामी समर्थ शेतकरी विकास परिवर्तन पॅनलमध्ये जोरदार लढत होत विद्यमान सभापती संजीवकुमार पाटील, सिद्रामप्पा पाटील, अप्पासाहेब पाटील, राजेंद्र बंदीछोडे, बसवराज माशाळे, श्रीशैल घिवारे यांचा विजय झाला तर विरोधी गटातील मातब्बर असलेले माजी नगराध्यक्षा डॉ.सुवर्णा मलगोंडा, माजी सरपंच बसवराज तानवडे, कपिल शिंदे यांचा पराभव झाला.

अक्कलकोट बाजार समितीच्या सभापतीपदी यंदा पुश्चच: एकदा माजी आमदार सिद्रामप्पा पाटील हे विराजमान होवून विरोधकांना पळता भुई करण्यासाठी सज्ज होणार असल्याची चर्चा देखील बाजार समितीच्या परिसरात सुरु आहे. दुधनी बाजार समितीकरिता भाजपाकडून आ. सचिन कल्याणशेट्टी व सिद्रामप्पा पाटील आणि माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, शंकर म्हेत्रे व प्रथमेश म्हेत्रे यांच्या पॅनलमध्ये लढत झाली. विद्यमान सभापती प्रथमेश म्हेत्रे व माजी सभापती शंकर म्हेत्रे व पंचायत समितीचे माजी सभापती महेश जानकर यांचा पराभव झाला. या बाजार समितीवर भाजपाने सत्ता काबीज करुन इतिहास घडविला आहे. दुधनी बाजार समिती निवडणुकीचा निकाल हा धक्कादायक लागल्याने माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांना आगामी निवडणुकीकरिता धोक्याची घंटी तर नाही ना? अशी चर्चा देखील सुरु झाली आहे.

## दादांनी दुधनीचा अभेद्य गड भेदला


आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी मात्र दुधनी बाजार समितीच्या निवडणुकीकरिता चक्रव्यूह भेदून विरोधकांना जोरदार धक्का देत बाजार समिती काबीज केल्याने जिल्ह्यासह राज्यात आ.सचिन कल्याणशेट्टी यांच्या विजयाची चर्चा जोरात सुरु आहे. दुधनी बाजार समिती स्थापन झाल्यापासून आजतागायत भाजपाने अनेकवेळा प्रयत्न करुन देखील सत्ता काबीज करता आले नाही. गतवेळी झालेल्या निवडणुकीत भाजपाचे तीन ते चार उमेदवार हे केवळ काही मताच्या फरकाने पराभव झाले. यंदा मात्र आमदार कल्याणशेट्टी यांनी गत महिनाभरापासून गणिते आखून यंदा दुधनीचा गड भेदण्याचे चंगच बांधलेला होता. अखेर त्यांच्या या प्रयत्नाला यश आले.

# कुर्डूवाडी बाजार समितीचा चेअरमन कोण होणार?

उल्हास पाटील

कुर्डूवाडी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीमध्ये शिंदे बधूंनी दणदणीत विजय मिळवत कुर्डूवाडी बाजार समितीवर एक हाती सत्ता मिळवली. तर सर्वपक्षीय विरोधकांचा दारूण पराभव केला. या बाजार समितीच्या निवडणुका पार पडल्या आत्ता चेअरमन कोण होणार याची चर्चा जोरदार सुरू झाली आहे.

कुर्डूवाडी कृषी उत्पन्न बाजार समितीवर माढ्याचे आमदार बबनराव शिंदे व करमाळ्याचे आमदार संजय शिंदे बंधू कृषी उत्पन्न बाजार समिती वर वर्चस्व असल्याचे दाखवून दिले तर आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांचे बंधू शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रा. शिवाजी सावंत, टेंभुर्णीचे संजय कोकाटे, भाजपा, स्वाभिमानी शेतकरी संघटना, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, संभाजी ब्रिगेड आदी विरोधी पक्षाने एकत्र येऊन कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूक लढवल्या होत्या मात्र या सर्व विरोधकांचा दारू->न पराभव झाला. या गटातील सर्वांना आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. तर शिंदे बंधूंनी आपले वर्चस्व दाखवून दिले तसेच माढ्याचे माजी आमदार धनाजी साठे व त्यांचे पुत्र दादासाहेब साठे यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून आले.



कुर्डूवाडी कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक पार पडली मात्र या निवडणुकीनंतर बाजार समितीचा चेअरमनपदी कोणाची निवड करायची याचे शिंदे बंधू समोर मोठे आव्हान असल्यामुळे या चेअरमन पदासाठी कोणाला संधी मिळणार याची चर्चा जोर धरू लागले आहे. शिंदे बंधू कोणावर जबाबदारी सोपवणार का? आमदार संजय शिंदे हे चेअरमन राहणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. बाजार समितीवर गेल्या पंधरा ते वीस वर्षांपासून संचालक पद राहिलेले अनेक जण या निवडणुकीमध्ये निवडून आले आहेत. त्यामुळे जुन्या संचालकांना संधी मिळणार की नुतन संचालकास संधी देणार याचीही चर्चा सुरू झाली आहे. या बाजार सरामितीमध्ये आमदार संजय शिंदे, सुहास पाटील, रमेश पाटील, हनुमंत पाटोळे, शिवाजी पाटील, दिलीप भोसले, नागनाथ पाटील, सुरेश बागल, पोपट थोबाडे, उत्कर्ष देशमुख, अमोल देवकर, किसन पाटील, सतीश सुर्वे, विजयकुमार लोंढे, संतोष अनभुले, राजाभाऊ वाघमारे, निकिता खटके सुमन मोरे हे नुतन संचालकपदी निवडुन आले आहेत. करमाळा मतदार संघामध्ये माढा तालुक्यातील ३६ गावे समाविष्ट आहेत. त्यामुळे माढा तालुक्याचे आमदार बबनदादा शिंदे व त्यांचे बंधू करमाळ्याचे आमदार संजय शिंदे हे ३६ गावातील संचालकाला संधी देणार का? आमदार बबनदादा शिंदे माढा मतदारसंघातील संचालकांना संधी देणार याचीही चर्चा सुरू झाली आहे.

### यांच्या नावाची चर्चा

यामध्ये प्रामुख्याने उपसभापती राहिलेले सुहास पाटील, रमेश पाटील, दिलीप भोसले, नागनाथ पाटील यांनी बाजार समितीचा चांगला अभ्यास आहे. यामुळे या पैकी कोणात्या संचालकास सभापती पदाची संधी देणार मिळणार का? आमदार संजय शिंदे सभापती पद आपल्याकडे ठेवणार हे येणाऱ्या दिवसांमध्ये चित्र स्पष्ट होईल.

# राष्ट्रवादीला झालंय तरी काय?

डी.एस.गायकवाड

**तुमचा माझ्यावर भरोसा नाय काय हे गीत जरी जुनं झालं असलं तरी राष्ट्रवादीत मात्र अजित पवारांच्या बाबतीत तशी परिस्थिती सध्या निर्माण झाली आहे. मोठ्या पवार साहेबांना कुरवळताना छोट्या पवार साहेबांबाबत मात्र संशयाचे कल्लोळ उठवले जात आहेत. पण अजित पवारांच्या डोक्यात जी पक्षाबाबत ध्येय धोरणे आहेत, भविष्यातील पक्ष सक्षमीकरणाचा जो पर्याय ते उभा करू पाहताहेत त्याबद्दल मात्र कुणीही विचार करताना दिसत नाही. नजदीकी फायदे से दूर का नुकसान सोचना चाहिए... आणि याचाच विसर सध्या राष्ट्रवादीला पडलेला दिसत आहे. त्यामुळे अजित पवारांचीच बाजू योग्य आहे असा एक सूर सध्या सुज्ञ लोकांकडून व्यक्त केला जात आहे.**

बहुमत चुकीचे असेल तर ते कधीही स्वीकारू नये असे संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचे एक वचन आहे. राजकारणात मात्र बहुमतालाच किंमत असते. पण काही निर्णय हे बहुमताच्या विरुद्ध जाऊन घ्यावे लागतात आणि काळाचे द्योतक तेच ठरतात. सध्याच्या परिस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तीच मोठी चूक करताना दिसत आहे. काळानुरुप बदललं पाहिजे, पुढे टिकायचे असेल तर नवीन माणसे तयार झाली पाहिजेत याचाच विसर सध्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला पडलेला दिसत आहे आणि त्यामुळेच आपली कट्टरता दाखवण्याच्या नादात राष्ट्रवादीचा भविष्यकाळ अंधारात चालल्याचे चित्र सध्या पहावयास मिळत आहे. हा बदल अजित पवारांना करायचा आहे. भविष्यात टिकणारी पक्ष बांधणी त्यांना करायची आहे पण त्यांचे ऐकेल ती राष्ट्रवादी कसली? मोठ्या पवारांवर तर सर्वांचेच प्रेम आहे. कुणी आजपर्यंत त्यांचा अनादर तरी केलाय का? सर्वांच्या मनात त्यांच्यासाठी उच्च स्थानच आहे पण बदलणे किती गरजेचे आहे हे कोणाच्याच लक्षात येताना दिसत नाही. मोठ्या पवारांचे वय विसरून लोक त्यांना अजूनही तरुण कार्यकर्ताच समजतात त्यांच्यातील असणाऱ्या त्या विश्वासाचा तो भाग असू शकतो मात्र काळ कोणासाठी थांबणार आहे का? बदल हा काळाचा नियम आहे. परिवर्तन हा सृष्टीचा अंगीभुत गुण आहे. पण राष्ट्रवादीला हे काहीच मान्य नसल्याचे दिसत आहे त्यांना फक्त हवे आहेत मोठे पवार साहेब.. ठीक आहे ते मोठेच आहेत पण अजित पवारांच्या मनातील जो भविष्याचा विचार आहे त्याबाबत मात्र पक्षपातळीवर कुठेही विचार होताना दिसत नाही. अजित पवार हे एक रांगड्या स्वभावाचे व्यक्तिमत्त्व आहेत ते दिलखुलास बोलतात. रोखठोक बोलणारी माणसे स्पष्ट स्वभावाची असतात. राजकारणाचा त्यांचा अभ्यास आता दांडगा झाला आहे त्यामुळेच ते राष्ट्रवादीत बदल सुचवु इच्छित आहेत. म्हणूनच अध्यक्ष बदलाच्या निर्णयाचे स्वागत व्हायला हवे होते.

### ...तर ठाकरे सेना व्हायला वेळ लागणार नाही

सध्याच्या राजकारणात राष्ट्रवादी ज्या ठिकाणी आहे किमान त्या ठिकाणी तरी ती कायम राहिली पाहिजे अन्यथा राष्ट्रवादीची ठाकरे सेना व्हायला वेळ लागणार नाही. यासाठीच बदल आवश्यक असतात ते बदल करावे लागतात आणि हाच विचार अजित पवार यांच्या डोक्यात आहे. पक्ष बांधणीला बळकटी आली असती.दुसरे शरद पवार निर्माण होणार नाहीत हे सत्य आहे पण त्यासाठी प्रयत्न का करू नयेत पण सध्या सगळ्यांचेच पवार प्रेम उतू चालले आहे. भविष्याचा वेध घेणारा निर्णय कोणीही घेताना दिसत नाही.

# सहकारातल्या वर्चस्वाला आमदार राऊतांचा दे धक्का



सचिन अपसिंगकर

**बार्शी तालुक्याच्या राजकारणात आमदार राजाभाऊ राऊत गेली ३० वर्षे सक्रिय आहेत. त्यांनी आपल्या राजकीय वाटचालीत दोन वेळा आमदारकी मिळवली. दोन वेळा नगरपालिकेची सत्ता आपल्या ताब्यात ठेवली. त्यांनी पंचायत समितीवर चार वेळा वर्चस्व मिळवले. चार वर्षांपूर्वी त्यांनी तालुक्यातील मोठी सहकारी पणन संस्था असलेल्या बाजार समितीवर झेंडा फडकवला. दोन जिल्ह्यात कार्यक्षेत्र असलेल्या संतनाथ कारखान्याच्या निवडणुकीतही त्यांनी विरोधकांना आव्हान दिले होते. बार्शी तालुक्याच्या राजकारणात ग्रामीण भागातील मोठा वर्ग हा सहकार क्षेत्राशी जोडला गेलेला आहे. त्यामुळे सहकारी संस्थावरील वर्चस्व आणि नियंत्रण हे तालुक्याच्या राजकारणावर वर्चस्व कायम ठेवण्यासाठी महत्वाचे आहे. हे आमदार राऊत यांना अनुभवाअंती लक्षात आले आहे.**

सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणातील प्रस्थापित मातब्बर राजकीय नेते हे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व जिल्हा दूध संघावर संचालक आहेत. त्यांच्या विरोधात गेल्या दोन दशकामध्ये नवोदित नेते सक्रिय झाले. राज्याच्या राजकारणात गेल्या दहा वर्षात झालेल्या भारतीय जनता पक्षाच्या जोरदार मुसंडी नंतर या प्रस्थापित विरोधी नेत्यांना बळ मिळाले. आता जिल्ह्याच्या राजकारणात ताकद असणारे माजी मंत्री विजयसिंह मोहित-पाटील, माजी सहकारमंत्री सुभाष देशमुख, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार राम सातपुते, माजी आमदार प्रशांत परिचारक, आमदार समाधान अवताडे यांच्याशी आमदार राऊत यांचे सख्य आहे. जिल्हा परिषद निवडणुकांच्या पदाधिकारी निवडी दरम्यान आमदार राऊतांची भूमिका महत्वाची ठरली. भाजप आमदारांशी जिल्ह्याच्या राजकारणात ऐकी घडवून काँग्रेस, राष्ट्रवादी प्रणित प्रस्थापित नेत्यांना आव्हान देण्यासाठी आमदार राऊत यांनी प्रयत्न केले आहेत. बार्शी तालुक्याच्या सहकार क्षेत्रावरही आमदार राऊत यांनी सोसायटी निवडणुकांच्या माध्यमातून चढाई केली आहे. त्यामुळे बार्शी तालुक्यात झालेल्या सोसायट्यांच्या निवडणुका गाजल्या.

आमदार राऊत यांनी दहा वर्षांपूर्वी सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या कार्यपध्दतीच्या विरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेचे मोठे पडसाद उमटले आहे.

नुकतेच या संचालक मंडळावर जबाबदारीची निश्चिती झाली आहे. सध्या या बँकेवर प्रशासक मंडळ कार्यान्वित आहे. या बँकेच्या निवडणुकाही प्रस्तावित आहेत. प्रशासक मंडळाला मुदतवाढ देण्याची मागणी होत आहे. अशा परिस्थितीमध्ये राज्यसरकार कोणता निर्णय घेणार याकडे जिल्ह्याच्या सहकार क्षेत्राचे लक्ष आहे. या बँकेने जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आजपर्यंत मोठा आधार दिला आहे. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये या बँकेचे जाळे पसरलेले आहे. जिल्ह्यात ग्रामीण भागात कानाकोपऱ्यात सोसायट्याही पसरलेल्या आहेत. शेतकऱ्यांच्या आर्थिक जिवनात या बँकेने नेहमीच महत्वाची भुमिका बजावलेली आहे. भुविकास सारख्या बँकांना धक्का बसल्यानंतर आता या महत्वाच्या बँकेचे सहकार क्षेत्रात व शेतकऱ्यांच्या जिवनात अबाधित स्थान राहणे गरजेचे आहे. त्यामुळे भविष्यात या बँकेमध्ये कोणते परिवर्तन घडते याकडे जिल्ह्याचे लक्ष आहे.

## शेतकऱ्याच्या हिताला बाधा येऊ नये ही अपेक्षा

राज्यात भाजपा प्रबळ आहे. सहकारातल्या काँग्रेस, राष्ट्रवादीच्या अधिपत्याला जोरदार टक्कर देण्यासाठी यापुढे भाजपा प्रणित शासन भुमिका घेणार हे उघड आहे.अशा परिस्थितीत भावी चढउतारांकडे जिल्ह्यातील सहकार क्षेत्राचे डोळे लागले आहेत. मात्र या लढाईत सामान्य शेतकऱ्याच्या हिताला बाधा येवु नये अशी सर्वांची अपेक्षा आहे.

# भाजप प्रदेश कार्यकारिणीत नव्या - जुन्यांची सांगड

**यंग जनरेशनला संधी दिल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह**

अजित उंब्रजकर

**महाराष्ट्र प्रदेश भाजपने जाहीर केलेल्या १ प्रदेश पदाधिकाऱ्यांच्या यादीत सोलापूरला डावलले असले तरी विशेष निमंत्रित सदस्य निमंत्रित सदस्य आणि प्रदेश कार्यकारणीत मात्र काही जणांची वर्णी लावली आहे. उदयशंकर पाटील, मनीष देशमुख, नरेंद्र काळे, नागेश वल्याळ या यंग जनरेशनसह अनुभवी नेत्यांच्या समावेशामुळे भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आहे.**



प्रदेश भारतीय जनता पार्टीने जाहीर केलेल्या विशेष निमंत्रितांच्या यादीत सोलापुरातील माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, माजी मंत्री प्रा. लक्ष्मणरा ढोबळे, माजी आमदार प्रशांत परिचारक, राजेंद्र मिरगणे, माजी जिल्हाध्यक्ष राजकुमार पाटील, केशवराव पाटील तसेच भारतीय जनता पार्टीत नव्यानेच दाखल झालेले उदयशंकर पाटील यांचा समावेश करण्यात आला आहे. निमंत्रित सदस्यांच्या यादीत माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार, भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष मनीष देशमुख, माजी नगरसेवक नागेश वल्याळ, गजानन भाकरे, संजय खिलारे, स्वराली बोबडे, अनुजा कुलकर्णी, स्मिता भावे, दीपक चव्हाण, माऊली हळवणकर, आप्पासाहेब देशमुख यांची वर्णी लागली आहे. प्रदेश कार्यकारिणीमध्ये सोलापूर शहरातून माजी विरोधी पक्षनेते नरेंद्र काळे तर सोलापूर ग्रामीणमधून माजी जिल्हाध्यक्ष शंकर वाघमारे यांना स्थान देण्यात आले आहे. भारतीय जनता पार्टीने केलेल्या या नव्या नियुक्त्यांमुळे पक्षामध्ये उत्साह संचारला आहे. माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार, माजी नगरसेवक नागेश वल्याळ, अनुजा कुलकर्णी, स्मिता भावे यांनाही प्रदेश निमंत्रितांच्या यादीत घेण्यात आले आहे. आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा, लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जाहीर झालेली ही यादी भाजपच्या निवडणुकीच्या तयारीचे द्योतक मानले जात आहे.

### काळेंना स्थान मिळाल्याने समाधानाची भावना



रा. स्व. संघाची पार्श्वभूमी असलेले हिंदुत्वनिष्ठ आणि पक्षसंघटनेशी एकनिष्ठ अशी कार्यकर्त्यांमध्ये प्रतिमा असलेले मनपाचे माजी विरोधी पक्षनेते नरेंद्र काळे यांच्याकडे पक्षाचे दुर्लक्ष झाल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये होती. गतवेळी त्यांना महापालिका निवडणुकीत उमेदवारीही देण्यात आली नव्हती. त्यामुळे ते पक्षापासून काहीकाळ लांब होते. मात्र मध्यंतरीच्या काळात ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्षपद देऊन पक्षाने नरेंद्र काळे यांना पुन्हा प्रवाहात घेतले आहे. आता त्यांना कार्यकारिणीत स्थान दिल्याने कार्यकर्त्यांमध्ये समाधानाची भावना आहे.

### वाघमारेंमुळे सामान्य कार्याकर्त्याला न्याय



प्रदेश कार्यकारिणी सदस्यपदी भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष तथा किसान मोर्चा चे प्रदेश उपाध्यक्ष शंकरराव वाघमारे यांची ग्रामणीमधून नियक्ती करण्यात आली आहे. जिल्ह्यात प्रतिकूल परिस्थितित भाजपाचा विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रामाणिकपणे काम करणारे पैकी शंकरराव वाघमारे एक आहेत . त्यांनी गावचा सामान्य कार्यकर्ता ते मोहोळ तालुकाध्यक्ष जिल्हा सरचिटणीस, जिल्हाध्यक्ष, प्रदेश कार्यकारणी सदस्य ,प्रदेश उपाध्यक्ष किसान मोर्चा आदी पदावर काम केले आहे. मोहोळ तालुक्यातील भाजपाचे पहिले पंचायत समिती सदस्य म्हणून ते सर्वसाधारण जागेवरून निवडून आले होते.

### उदय पाटलांचे समर्थक खूष



भाजपमध्ये नुकतेच दाखल झालेले उदयशंकर पाटील यांचा कार्यकर्त्यांचा मोठा संच आहे. पक्षप्रवेश झाल्यानंतर पक्षाकडून योग्य दखल घेण्याच्या प्रतीक्षेत त्यांचे कार्यकर्ते होते. त्यामुळे भाजपच्या प्रदेश विशेष निमंत्रितांच्या यादीत उदयशंकर पाटील यांचा समावेश केल्याने त्यांचे समर्थक खूष आहेत.